महाराष्ट्र शासन

# विभागीय शिक्षण उपसंचालक,

पुणे विभाग पुणे-१ यांचे कार्यालय,

१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लालदेवळासमोर,पुणे-४११ ००१

w'site : www.dydepune.com
e-mail : dydpune@gmail.com
Phone : (020) 26122217


**अंतिम कारणे दाखवा नोटीस**

RPAD

जा.क्र./उमाशि-४०१/११ वी ऑनलाईन २०-२१/पुवि/२०/3434

दिनांक :- 28 JUL 2020

प्रति,

प्राचार्य,

१) आकाश इंग्लिश मेडियम स्कूल,
खांदवे नगर, लोहगांव ता.हवेली जि.पुणे

२) हंस इंग्लिश मेडियम स्कूल, ताथवडे
ता.हवेली जि.पुणे

३) प्रताप ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स,
धनकवडी ता.हवेली जि.पुणे

४) प्रेस्टीज पब्लिक स्कूल, शास्त्री कॅम्पस, शिवणे ता.हवेली जि.पुणे

५) संस्कार पब्लिक स्कूल, पठारे वस्ती, पाण्याच्या टाकी जवळ, लोहगांव
ता.हवेली जि.पुणे

**विषय :- इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०२०-२१ मधील कॉलेज नोंदणीबाबत**

**संदर्भ:-१) मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्य) म रा पुणे यांचे पत्र दि.१६.०७.२०**
**२) दि.०१.०७.२० रोजीच्या प्रसिध्दी निवेदनानुसार झालेल्या गुग्गल मिट बैठकीनुसार**
**३) दि.२०.०७.२० रोजी केलेला दुरध्वनी**
**४) दि.२१.०७.२०२० रोजी केलेल्या ईमेलद्वारे त्रुटी पुर्ततेबाबत**
**५) या कार्यालयाचे पत्र जा.क्र./उमाशि-४०१/११ वी ऑनलाईन २०-२१/पुवि/२० /३४२२ दि.२२.०७.२०२०.**
**६) या कार्यालयाकडून वारंवार दि.२७.०७.२०२० अखेर दुरध्वनी द्वारे संपर्क साधला आहे.**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणांस अंतिम कारणे दाखवा नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये इ.११ वी चे प्रवेश ऑनलाईन पध्दतीने पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात होणार आहेत, याबाबत आपणांस यापुर्वीच अवगत करण्यात आलेले होते. त्यानुसार आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाची गतवर्षीच्या शैक्षणिक वर्ष २०१९-२० माहिती मध्ये काही बदल झाला असल्यास त्याप्रमाणे बदल नोंदविण्यासाठी आणि कोणताही बदल झालेला नसल्यास त्याप्रमाणे कनिष्ठ महाविद्यालयाची नोंदणी करण्याबाबत आपणांस संदर्भ -३ नुसार आपणा झोननिहाय सर्व कमविच्या प्राचार्य व टेक्नीकल पर्सन च्या ऑनलाईन गुग्गल मिट बैठक घेऊन कॉलेज रजिस्ट्रेशन करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केलेले होते. तसेच झोननिहाय मुख्याध्यापकांशी झालेल्या ऑनलाईन बैठकीमध्ये सूचना देण्यात आलेल्या होत्या, प्रवेश प्रक्रियेत समाविष्ट असलेल्या प्रत्येक कनिष्ठ महाविद्यालयाने आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाची माहिती दि.२७.०७.२०२० पर्यंत ऑनलाईन पध्दतीने इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेच्या संकेतस्थळावर भरणे आवश्यक होते.



Scanned with CamScanner

दि.२७.०७.२०२० अखेर आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाची कोणत्याही प्रकारची माहिती संकेतस्थळावर भरलेली नाही, त्याचप्रमाणे आपण आपल्या कनिष्ठ महाविद्यालयांची माहिती अर्धवट/अपुर्ण भरुन इ.११ वी ऑनलाईन संकेतस्थळावर सादर केलेली आहे.

आपणांस इ.११ वी ऑनलाईन केंद्रीय समिती मार्फत वेळोवेळी एसएमएसद्वारे, ई-मेलद्वारे, वर्तमानपत्रातील प्रसिध्दीद्वारे आणि प्रत्यक्ष दुरध्वनी संदेशाद्वारे आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाची नोंदणी अचूकपणे करण्यास कळविण्यात आलेले होते. तथापि, आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाकडून अद्याप सदर माहिती संकेतस्थळावर अचुकपणे नोंदविण्यात आलेली नाही, ही बाब प्रशासकीयदृष्टया योग्य नाही. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाची सर्व माहिती अचूकपणे नोंदविणे ही आपली प्राथमिक जबाबदारी आहे आणि ही जबाबदारी आपण जाणीवपुर्वक टाळत असल्याचे समितीच्या निदर्शनास आलेले आहे. कोवीड-१९ संसर्गजन्य साथीच्या काळात शिक्षण उपसंचालक कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी वर्ग इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचे काम सुलभ होण्याच्या दृष्टीने कार्यालयात उपस्थित राहुन काम करत असतांना आपण त्यांना सहकार्य न करण्याची भूमिका योग्य नाही, या नोटीसीद्वारे आपणांस अंतिमतः कळविण्यात येते की, दि.३१.०७.२०२० रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाची अद्यायवत माहिती योग्य त्या दुरुस्त्यासह नोंदविली नाही तर आपले कनिष्ठ महाविद्यालये ऑनलाईन प्रक्रियेतुन वगळण्यात येईल, व आपणांस कोणत्याही परिस्थितीत शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये ऑफलाईन पध्दतीने प्रवेश करता येणार नाही, याची नोंद घेण्यात यावी.

आपणांस वेळोवेळी इ.११ वी ऑनलाईन प्रवेश समिती तथा शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे विभाग पुणे यांचेमार्फत सूचना देऊन सुध्दा आपल्याकडून या कामात अक्षम हलगर्जीपणा झालेला आहे, तसेच वरील सर्व संदर्भाद्वारे वेळोवेळी आपणांस कॉलेजची नोंदणी करण्यासाठी लेखी तसेच तोंडी सूचना दिलेल्या आहेत, तरीही आजअखेर आपण कॉलेजची नोंदणी केली नसल्याने आपल्या कॉलेजला इ.११वी साठी विद्यार्थी प्रवेश होऊ शकणार नाहीत तसेच कोणत्याही परिस्थितीत ऑफलाईन प्रवेशाची परवानगी या कार्यालयाकडून देण्यात येणार नाही, त्यामुळे या सर्व प्रकरणांमुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीस आपण वैयक्तिकरित्या स्वतः जबाबदार रहाल तसेच यानुसार आपणांवर महाराष्ट्र खाजगी शाळेतील (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ नुसार आणि महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) अधिनियम १९७७ नियम क्र-४(१) (फ) नुसार कारवाई का करण्यात येऊ नये? याचा लेखी खुलासा त्वरीत समक्ष सादर करावा. अन्यथा सदर खुलासा वेळेत सादर न केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहिल याची नोंद घेण्यात यावी.

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे -१. यांचे कार्यालय
28 JUL 2020
३४३४

(अनुराधा ओक)
अध्यक्ष
इ.११ वी विभागीय प्रवेश नियंत्रण समिती
तथा
प्र.शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**
१) मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे-१.
२) मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक ) महाराष्ट्र राज्य पुणे-१.



Scanned with CamScanner